(३) सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त(आस्थापना/विकास शाखा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या कार्यालयातील **सहाय्यक जन माहिती अधिकारी , जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय प्राधिका-यांचे फलक दर्शनी ठिकाणी प्रदर्शित करणे , १७ बाबींची माहिती तयार करुन त्यास प्रसिध्दी देणे** या कामाकरीता नेमलेल्या संनियंत्रण अधिका-यांचे अहवाल शासनाकडे प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त(आस्थापना/विकास शाखा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या कार्यालयाच्या १०० टक्के अनुपालनासंदर्भातील संकलित अहवाल **दिनांक ३१/८/२००९** पर्यंत शासनास पाठवावेत. अहवाल पाठवितांना सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त(आस्थापना/विकास शाखा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी यादी व त्यांच्या कार्यपूर्ततेबाबतची नोंद त्यात असणे आवश्यक राहील.

(४) या शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा अहवाल सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त(आस्थापना/विकास शाखा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी या विभागाकडे कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१.८.२००९ पर्यंत सादर करावा.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.govt.in या वेबसाईटवर संगणक सांकेतक क्रमांक २००९०८०४१८४३५५००१ वर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**(र. ग. सय्यद)**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रत**

१)विभागीय आयुक्त कोकण विभाग/नाशिक विभाग/पुणे विभाग/औरंगाबाद विभाग/ नागपूर विभाग/अमरावती विभाग.

२) विभागीय आयुक्त कोकण विभाग/नाशिक विभाग/पुणे विभाग/औरंगाबाद विभाग/ नागपूर विभाग/अमरावती विभाग यांच्या कार्यालयातील उपायुक्त (आस्थापना/विकास)

३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

४) सर्व सहसचिव/उपसचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई -३२

५) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई-३२

६) अवर सचिव, जल-२३ कार्यासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई -३२.

७) मा. प्रधान सचिव(जलसंधारण) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे स्वीय सहायक.

८) मा.सचिव(ग्राम विकास) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे स्वीय सहायक.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली
प्राप्त अर्जावर वेळेत कार्यवाही करणे

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.माअअ-२००९/प्र.क्र.७३ /समन्वय कक्ष,**
**मंत्रालय, मुंबई -३२.**
**दिनांक- १० ऑगस्ट, २००९.**

## परिपत्रक

प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने आणि नागरिकांना माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य पध्दती आखून देण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा कायदा पारित करण्यात आलेला आहे. लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह निर्माण करणे, व्यवहारात पारदर्शकता आणणे, शासन यंत्रणेचे प्रजेला जाब देण्यासाठी उत्तरदायित्व ठरविणे ही या कायद्याची काही उद्दिष्टे आहेत. या कायद्याची उपयुक्तता आणखीन जास्त चांगल्या रितीने सिध्द व्हावी म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आपली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडल्यास जनतेला मोठा दिलासा मिळून त्यांचे प्रश्न सोडविण्यास मदत होवू शकते.

२. त्यासाठी खालीलप्रमाणे सूचना पुन्हा देण्यात येत आहेत:-

१) जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेले अर्ज काळजीपूर्वक वाचून व त्याचा मतीतार्थ जाणून अर्जदारास माहिती देण्याचा प्रयत्न करावा. ज्या ठिकाणी एखाद्या मुद्दयाचे स्पष्टीकरण आवश्यक वाटते. त्यावेळेला अर्जदारास दूरध्वनीद्वारे किंवा पत्राने संपर्क साधून बोलाविण्यात यावे व मुद्दा स्पष्ट करुन घेण्यात यावा. ही कार्यवाही शक्यतो अर्ज मिळाल्यापासून पहिल्या ५ दिवसांतच करणे आवश्यक आहे. अर्ज किंवा त्याचा काही भाग हा दुसऱ्या जनप्राधिकरणाशी संबंधित असल्यास तो अर्ज किंवा त्याचा भाग हा ५ दिवसांच्या आंत संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडे माहिती देण्यासाठी पाठविण्यात यावा व तसे अर्जदारासही तात्काळ कळविण्यात यावे.

२) एखादी माहिती जनमाहिती अधिकाऱ्याकडे उपलब्ध नसल्यास कोणत्या मुद्दयांची माहिती उपलब्ध नाही हे स्पष्टपणे अर्जदारास कळविण्यात यावे. अर्जदारास हवी असणारी माहिती ही फार विस्तृत स्वरुपाची असल्यास तर अर्जदारास निश्चितपणे चर्चेला बोलाविण्यात यावे. चर्चेतून वा आपसातील सहमतीने व अर्जदारास संपूर्ण नस्तीची / कागदपत्रांची तपासणी करुन घेवून त्यांना त्यांच्या मुद्दयांशी संबंधित आवश्यक ती माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

३) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली माहिती मिळविण्यासाठी केलेल्या अर्जातील एखादी विनंती ही माहिती किंवा अभिलेख या सदरात येत नाही असे जनमाहिती अधिकाऱ्यास वाटत असल्यास त्यासंबंधीचे विस्तृत कारण जन माहिती अधिकारी यांनी द्यावे. ज्यावेळेला माहिती नाकारायची असेल त्यावेळी अधिनियमाच्या कलम ८ व ९ च्या कोणत्या पोट कलमानुसार माहिती नाकारली जात आहे हे स्पष्टपणे नमूद करावे.

४) जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्जदारास माहिती देत असतांना पत्रात स्पष्टपणे आपले नांव व पदनाम, कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक इत्यादी माहिती द्यावी. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नांव, पदनाम व संपूर्ण कार्यालयीन पत्ता नमूद करावा व किती दिवसाच्या आंत अपील दाखल करायचे याचाही उल्लेख त्यात असावा.

५) प्रथम अपिलातील अपिलार्थीस सुनावणी देणे हे आवश्यक आहे. अपीलार्थीचे सर्वच मुद्दे मान्य करण्यात येत असतील तर अपीलार्थीस सुनावणीस बोलाविण्यात आले नाही तरी चालेल. अन्यथा, अपीलार्थीस सुनावणीसाठी बोलाविणे आवश्यक आहे याची सर्व अपिलीय अधिकाऱ्यांनी जाणीव ठेवावी. प्रथम अपीलाच्या आदेशामध्ये द्वितीय अपिलीय अधिकारी यांचे नांव व त्यांचा पत्ता निश्चितपणे नमूद करण्यात यावा व किती दिवसात अपील दाखल करावे याचाही उल्लेख सदर आदेशात करण्यात यावा.

६) ज्या ठिकाणी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांना जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य बजावण्यात कसून केलेली आहे, असे वाटत असल्यास त्याबाबत अपीलार्थीचा मूळ अर्ज, अपीलार्थीचे अपील, जन माहिती अधिकारी यांनी दिलेले निवेदन व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे व शिफारस व त्यांचा निर्णय या सर्व गोष्टी आयोगास पाठविणे आवश्यक आहे.

७) प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती न दिल्याबद्दलचे त्यांचे म्हणणे विस्तृतपणे द्यावे. जनमाहिती अधिकारी यांचे यासंदर्भातील जे म्हणणे असेल ते त्याचे अध्ययन करण्यास अपिलार्थीस पूरेपूर संधी मिळणे शक्य होण्यासाठी व परिणामी अपीलार्थीस आपले मुद्दे व्यवस्थितपणे मांडता येणे शक्य होण्याच्या दृष्टीने अपीलार्थीस शक्यतो ३ दिवस अगोदर देण्याचा प्रयत्न करावा. ते शक्यच झाले नाही वा अर्जदारास ते मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे असेल तर अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला ते निश्चितपणे देण्यात यावे.

८) जन माहिती अधिकाऱ्याने माहिती देण्यात कसूर केलेली आहे असे अपीलीय अधिकाऱ्याच्या निदर्शनास आल्यास त्याची नोंद त्यांनी आपल्या आदेशात करावी. तसेच या आदेशाची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द करावयाच्या कारवाईच्या शिफारशीसह आयोगाकडे पाठवावी. त्यामुळे प्रत्येक जन माहिती अधिकाऱ्याच्या कामगिरीचे प्रत्येक अर्जागणीक मुल्यमापन होवून कायद्याची एकूणच परिणामकारकता वाढीस लागेल. जन माहिती अधिकाऱ्याविरुध्द शास्तीची कारवाई झाली असेल किंवा त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशीत काही शिक्षा ठोठावण्यात आली असेल तर त्याचीही नोंद गोपनीय अहवालात व सेवापुस्तकात घेण्यात यावी.

९) जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य बजावित असतांना त्यांना त्यांच्या विभागात ज्या अडचणी आल्या असतील त्या अडचणी दूर करण्याचा विभाग प्रमुखाने प्रयत्न करावा.

१०) सर्व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी कायद्यातील सर्व तरतुदींचे पालन करावयाचे आहे. माहिती देण्याच्या मुदतीबाबतीत व माहितीच्या गुणवत्तेबाबत याप आयोगाकडून अतिशय कठोर धोरण स्विकारण्यात येणार आहे.

३. वरील बाबी आपल्या अधिपत्याखालील व आपल्या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व माहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात व त्याप्रमाण कार्यवाही करण्याबाबत सूचना दयाव्यात व तसे केल्याचे शासनास कळवावे.

४. या संदर्भात माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास पाठविलेल्या दिनांक २४.२.२००९ च्या पत्राची प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.govt.in या वेबसाईटवर संगणक सांकेतांक क्रमांक २००९०८१९ 98 95 82009 वर प्रसिध्द करण्यात आले आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**(र. ग. सय्यद)**
शासनाचे उप सचिव

**सहपत्रः-**मा.महिती आयुक्तांच्या
दि.२४.२.२००९ च्या पत्राची प्रत.

**प्रतः-**

१)विभागीय आयुक्त कोकण विभाग/नाशिक विभाग/पुणे विभाग/औरंगाबाद विभाग/ नागपूर विभाग/अमरावती विभाग.
२) विभागीय आयुक्त कोकण विभाग/नाशिक विभाग/पुणे विभाग/औरंगाबाद विभाग/ नागपूर विभाग/अमरावती विभाग यांच्या कार्यालयातील उपायुक्त (आस्थापना/विकास)
३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
४) सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
५) सर्व सह सचिव/उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई -३२
६) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
७) अवर सचिव,जल-२३ कार्यासन,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
८) मा. प्रधान सचिव(जलसंधारण) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे स्वीय सहायक.
९) मा.सचिव (ग्राम विकास व पंचयत राज) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे स्वीय सहायक.

डॉ. सुरेश वि. जोशी
मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २४ फेब्रूवारी, २००९

प्रति,

श्री. जॉनी जोसेफ
मुख्य सचिव,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२

महोदय,

आपणाला माहितच आहे की, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने आणि नागरिकांना माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य पध्दती आखून देण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा कायदा पारित करण्यात आलेला आहे. लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह निर्माण करणे, व्यवहारात पारदर्शकता आणणे, शासन यंत्रणेचे प्रजेला जाब देण्यासाठी उत्तरदायित्व ठरविणे ही या कायद्याची काही उद्दिष्टे आहेत.

महाराष्ट्राला चळवळीची परंपरा आहे, व माहितीचा अधिकार अधिनियम अस्तित्वात यावा व त्याची चांगल्या रितीने अंमलबजावणी व्हावी यासाठी मा.अण्णा हजारे यांनी केलेले प्रयत्नही सर्वश्रुतच आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियमाखाली गेल्या सव्वा तीन वर्षात महाराष्ट्र राज्यामध्ये अंदाजे आठ लाखाच्या वर अर्ज आलेले आहेत ही एकच गोष्ट हा कायदा जनतेला किती उपयुक्त वाटतो हे सिध्द करुन देण्यासाठी समर्थ आहे.

..२..

१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी : ०२२-२२८५ ६० ७८ फॅक्स : ०२२-२२०४ ९३ ९०
e-mail : sureshjoshi_cic@hotmail.com
website : www.sic.maharashtra.gov.in

या कायद्याची उपयुक्तता आणखीन जास्त चांगल्या रितीने सिध्द व्हावी म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आपली जबाबदारी काटेकोरपणे जर पार पाडली तर जनतेला मोठाच दिलासा मिळून त्यांचे प्रश्न सोडविण्यास मदत होवू शकते.

अधिनियमाच्या कलम ७ (१) अन्वये जन माहिती अधिका-याला अर्ज मिळाल्यानंतर शक्य तितक्या शिघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसांच्या आत फीचे प्रदान केल्यानंतर(दारिद्रयरेषेखालील व्यक्तींना फी नाही.) माहिती द्यायला पाहिजे. तसेच एखादया व्यक्तीच्या जिवीत वा स्वातंत्र्य या संबंधातील माहिती मागण्यात आली असेल तर ती विनंतीचा अर्ज मिळाल्यापासून ४८ तासात द्यावी लागते.

जर त्रयस्थ पक्षाची माहिती असेल तर त्या व्यक्तीशी संपर्क साधून तिचे म्हणणे जाणून घेण्यासाठी अतिरिक्त १०दिवसांचे प्रावधान केलेले असते. म्हणजेच अशा परिस्थितीत माहिती अर्ज मिळाल्यापासून ४० दिवसांच्या आंत माहिती देणे हे आवश्यक आहे. ज्या वेळेला अपीलार्थीस माहिती देण्यासाठी फीची मागणी करण्यात येते त्यावेळेस फी कशाच्या आधारे आकारण्यात आली याचे स्पष्ट विवेचन असावयास पाहिजे. म्हणजेच प्रती पृष्ठाचा दर, पृष्ठांची संख्या व अर्जदारास मागितलेली फी व पोस्टेजची रक्कम याचा स्पष्ट उल्लेख अर्जदाराला लिहिलेल्या पत्रात असायला पाहिजे. तसेच अर्जदार स्वतः कार्यालयातून माहिती घेवून जावू इच्छित असेल तर त्याला तशी मुभा आहे व पोष्टाने त्याला माहिती मिळावी अशी इच्छा असेल तर पोष्टाचे चार्जेस आकारुन त्याला पोष्टाने माहिती पाठवायला पाहिजे. ३० दिवसांचा कालावधी विचारात घेत असतांना अर्जदारास फी संबंधी पाठविलेल्या पत्राची तारीख व अर्जदाराने प्रत्यक्ष फी प्रदान केल्याची तारीख यामधील अवधि हा ३० दिवसांची परिगणना करताना वगळण्यात येतो.

जन माहिती अधिका-याने कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळण्याबाबतचा अर्ज स्वीकारण्यास नकार दिला किंवा वेळेत माहिती सादर केली नाही किंवा माहितीची विनंती दुष्ट हेतूने नाकारली किंवा जाणून-बुजून चुकीची, अपूर्ण आणि दिशाभूल करणारी माहिती दिली किंवा मागितलेली माहिती नष्ट केली किंवा माहिती सादर करण्यास अडथळा आणला असे जर

..३..

आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द करायच्या कारवाईच्या शिफारशीसह पाठवावी. जेणेकरुन प्रत्येक जन माहिती अधिका-याच्या कामगिरीचे प्रत्येक अर्जागणीक मुल्यमापन होवून कायद्याची एकूणच परिणामकारकता वाढीस लागेल. जर जन माहिती अधिका-याविरुध्द शास्तीची कारवाई झाली असेल किंवा त्याच्या विरुध्द विभागीय चौकशीत काही शिक्षा ठोठावण्यात आली असेल तर त्याचीहि नोंद गोपनीय अहवालात व सेवापुस्तकात घेण्यात यावी.

प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती न दिल्याबद्दलचे त्यांचे म्हणणे विस्तृतपणे द्यावे. जन माहिती अधिकारी यांचे यासंदर्भातील जे म्हणणे असेल ते अपीलार्थीस शक्यतो ३ दिवस अगोदर देण्याचा प्रयत्न करावा. जर ते शक्यच झाले नाही वा अर्जदारास ते मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे असेल तर अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला ते निश्चितपणे देण्यात यावे. त्याचे अध्ययन करण्यास अपीलार्थीस पुरेपूर संधी देण्यात यावी, जेणेकरुन अपीलार्थी आपले मुद्दे व्यवस्थितपणे मांडू शकेल.

ज्या ठिकाणी प्रथम अपिलीय अधिका-यांना असे दिसून येत असेल की, जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य बजावण्यात कसुर केलेली आहे त्याबाबत अपीलार्थींचा मुळ अर्ज, अपीलार्थींचे अपील, जन माहिती अधिकारी यांनी दिलेले निवेदन व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे व शिफारस व त्यांचा निर्णय या सर्व गोष्टी आयोगास पाठवाव्यात.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य बजावित असतांना त्यांना त्यांच्या विभागात ज्या अडचणी आल्या असतील त्या अडचणी दुर करण्याचा विभागप्रमुखाने प्रयत्न करावा.

कांही वेळेला अर्जदारास नेमकी कोणती माहिती पाहिजे हे कळणे अवघड होवून बसते. जन माहिती अधिका-यांनी अर्ज काळजीपूर्वक वाचून व त्याचा मतीतार्थ जाणून अर्जदारास माहिती देण्याचा प्रयत्न करावा. मात्र ज्याठिकाणी एखदया मुद्दयाचे स्पष्टीकरण आवश्यक वाटते त्यावेळेला अर्जदारास दुरध्वनीद्वारे किंवा पत्राने संपर्क साधून चर्चेला बोलाविण्यास हरकत नाही व मुद्दा स्पष्ट करुन घेण्यांत यावा. ही कारवाई शक्यतो अर्ज मिळाल्यापासून पहिल्या ५ दिवसांतच

आयोगास दिसून आले तर अर्ज स्वीकारीपर्यंत किंवा माहिती देईपर्यंत प्रत्येक दिवसाला रु. २५०/- प्रमाणे शास्ती लादण्याचे अधिकार कायद्यान्वये आयोगाला प्राप्त झालेले आहेत. अशा शास्तीची एकूण रक्कम ही रु.२५,०००/- पर्यंत असू शकते. हे करण्यापूर्वी अर्थातच जन माहिती अधिका-याला त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येत असते. मात्र त्याने केलेली कृति ही वाजवी आहे हे शाबीत करण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिका-यावरच असते. जर अशा प्रकारची चुक ही जन माहिती अधिका-याकडून मुद्दामहून आणि सातत्याने घडत असेल तर जन माहिती अधिका-या विरुध्द सेवा नियमान्वये शिस्तभंगाच्या कारवाईची आयोग शिफारस करु शकते.

हे सर्व विस्ताराने लिहिण्याचे कारण असे की, यापुढे जन माहिती अधिका-याने वेळेच्या बाबतीत अत्यंत काटेकोरपणे माहिती देणे हे अत्यावश्यक समजले जाणार आहे. तसेच माहिती देण्यामध्ये जन माहिती अधिका-याव्यतिरिक्त ज्याचा, ज्याचा सहभाग आवश्यक होतो, त्या सर्वांवर या कायद्यान्वये कारवाई होवू शकते, हे हि स्पष्ट करणे हे आहे.

जन माहिती अधिका-याच्या निर्णयाविरुध्दचे अपील हे प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे ३० दिवसांचे आत करायचे असते व त्यावर ३० दिवसांच्या आत प्रथम अपिलीय अधिका-यांनी आपला निर्णय द्यायचा असतो. प्रथम अपिलीय अधिका-यांनी एक तर निर्णयच दिला नाही , वा तो दिला असेल तर विलंबाने दिलेला आहे अशा बाबी मी यापूर्वीही आपल्या निदर्शनास आणलेल्या आहेत व प्रथम अपिलीय अधिका-यांना याबाबतीत मुदतीचे पालन करण्याच्या सक्त सूचना देण्याचे निर्देशही याआधी दिलेले आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी हा त्या विभागातील चांगल्या वरिष्ठतेचा व सामाजिक बांधीलकी जपणारा असेल तर ते कायद्याच्या यशस्वितेच्या दृष्टीने आवश्यक ठरते. अपिलीय अधिकारी यांनी अपील आदेश हे वेळेत पारित करावेत हे येथे पुन्हा एकदा प्रकर्षाने नमूद करण्यात येते. तसेच त्यांनी आदेश पारित करीत असतांना त्यांच्या निदर्शनास जेथे जेथे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यात कसूर केलेला आहे किंवा हलगर्जीपणा केलेला आहे त्याची नोंद त्यांनी त्यांच्या आदेशातच करावी व त्या आदेशाची प्रत ही

करावी. जर अर्ज किंवा त्याचा काही भाग हा दुस-या जनप्राधिकरणाशी संबंधित असेल तर तो अर्ज किंवा त्याचा भाग हा ५ दिवसांच्या आंत संबंधित जन माहिती अधिका-याकडे माहिती देण्यासाठी पाठवावा व तसे अर्जदारासही तात्काळ कळवावे.

जर एखादी माहिती उपलब्धच नसेल तर कोणत्या मुद्दयाची माहिती उपलब्ध नाही हे स्पष्टपणे अर्जदारास कळवावे. जर अर्जदारास हवी असणारी माहिती ही फार विस्तृत स्वरुपाची असेल तर अर्जदारास निश्चितपणे चर्चेला बोलवावे व चर्चेतुन वा आपसातील सहमतीने व अर्जदारास संपूर्ण नस्तीची तपासणी करुन देवून त्यांना त्यांच्या मुद्दयाशी संबंधित आवश्यक ती माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

जर एखादी विनंती ही माहिती किंवा अभिलेख या सदरात येत नाही असे म्हणणे असेल तर त्यासंबंधीचे विस्तृत कारण जन माहिती अधिकारी यांनी द्यावे. ज्यावेळेला माहिती नाकारायची असेल त्यावेळेला अधिनियमाच्या कलम ८ व ९ च्या कोणत्या पोटकलमानुसार माहिती नाकारली जात आहे हे स्पष्टपणे नमूद करावे.

जन माहिती अधिका-यानी माहिती देत असतांना स्पष्टपणे आपले नाव व पदनाम, कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक इत्यादी माहिती द्यावी. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नांव , पदनाम व संपूर्ण कार्यालयीन पत्ता नमूद करावा व किती दिवसाच्या आत अपील दाखल करायचे याचाहि उल्लेख त्यात असावा.

प्रथम अपीलातील अपीलार्थीस सुनावणी देणे हे आवश्यक आहे. जर अपीलार्थीचे सर्वच मुद्दे मान्य करण्यात येत असतील तर अपीलार्थीस सुनावणीस बोलाविण्यात आले नाही तरी चालेल. एरवी अपीलार्थीस सुनावणीसाठी बोलाविणे हे आवश्यक आहे याची सर्व अपिलीय अधिका-यांना जाणीव करुन द्यावी. प्रथम अपीलाच्या आदेशामध्ये द्वितीय अपिलीय प्राधिकारी यांचे नाव व त्यांचा पत्ता निश्चितपणे नमूद करण्यात यावा व किती दिवसात अपील दाखल करावे याचाहि उल्लेख त्याठिकाणी करण्यात यावा.

कायद्यातील प्रमुख तरतुदी दर्शविणारे मुख्य मुद्दे वर मांडलेले आहेत. याव्यतिरिक्त कायद्यातील इतर सर्व तरतुदींचे पालन हे सर्व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी करावयाचे आहे. माहिती देण्याच्या मुदतीबाबतीत व माहितीच्या गुणवत्तेबाबत यापुढे अतिशय कठोर धोरण आयोग स्वीकारणार आहे याची जाणीव प्रकर्षाने सर्व अधिका-यांना करुन देण्यात यावी.

आपण या पत्रास अनुसरुन सर्व मंत्रालयीन विभागांना निर्देश द्यावेत ही विनंती.

आपला

(सुरेश वि. जोशी)
मुख्य माहिती आयुक्त.

प्रत अ.मु.स / प्र.स. / सचिव.

**माहितीचा अधिकार अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात ऑगस्ट २००९ च्या <u>अंतिम सप्ताहात विशेष मोहिम राबविणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन,**
**सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक - केंमाअ - २००९ / प्र.क्र. ९४ /६-स,**
**मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक - ११ ऑगस्ट, २००९.**

**<u>परिपत्रक</u>**

**वाचा :-**

शासन आदेश सामान्य प्रशासन विभाग क्रमांक - केमाअ-२००९/६३१/प्र.क्र.२६७/०९/सहा, दिनांक - २४ जुलै,२००९.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा दिनांक १२/१०/२००५ पासून अंमलात आला आहे. या अधिनियमातील कलम ४(१) (क) मधील तरतुदीप्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकारणाने सर्व अभिलेख योग्य रीतीने सूचीबध्द करुन त्याची निर्देश सूची तयार करणे व संगणकीकरण करणे शक्य असेल अशा अभिलेखांचे वाजवी कालावधीत व साधन संपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणीकरण करणे व ही माहिती नेटवर्कवर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. कलम ४(१) (ख) मधील तरतूदीनुसार हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून १२० दिवसांच्या आत १७ बाबींबरिल माहिती तयार करुन तो प्रसिध्द करणे आवश्यक होते. तसेच सदर माहिती वेळोवेळी अद्ययावतही करणे आवश्यक आहे. कलम ५ (१) व ५ (२) मधील तरतूदी पाहता सार्वजनिक प्राधिकरणांनी आवश्यक असतील तेवढया जास्तीत जास्त अधिका-यांना राज्य जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून निर्देशित करणे आवश्यक आहे. शासनाने या कार्यवाहीबाबत वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत.या उपरांत जनतेकडून या संदर्भात तक्रारी प्राप्त होत आहेत.दैनंदिन कामकाजाच्या व्यापामुळे अभिलेख सूचीबध्द करणे व त्यांची निर्देशसूची तयार करणे इ.कामे सार्वजनिक प्राधिकारणांनी पूर्ण न केल्याने माहिती पुरविण्यात विलंब होतो असे निर्दशनास आले आहे.

अभिलेख सूचीबध्द करणे व त्यांची निर्देशसूची तयार करणे या बाबींचे दीर्घकालीन महत्व विचारात घेता या कामासाठी विशेष मोहिम राबवून ते प्राथम्याने पूर्ण करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती. याबाबत शासन आदेश सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - २००९/ ६३१/ प्र.क्र.२६७/ ०९/ सहा, दिनांक २४ जुलै, २००९ अन्वये आदेश देण्यात आले आहेत. या आदेशाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(१) सर्व विभागीय सार्वजनिक प्राधिकारणांनी ऑगस्ट २००९ मधील अंतिम सप्ताह हा अभिलेख सूचीबध्द करणे व त्यांची निर्देशसूची तयार करणे ही कामे या विशेष मोहिमे अंतर्गत प्राथम्याने हाती घ्यावीत. कार्यालयातील सर्व अभिलेख्यांची निंदणी, विगतवारी करून ते सर्व सूचीबध्द करण्यात यावेत व त्यांच्या निर्देशसूच्या तयार करण्यांत याव्यात, तातडीच्या व अत्यावश्यक दैनंदिन बाबींकडे या मोहिमेमुळे दुर्लक्ष होणार नाही यांचीही दक्षता त्यांनी घ्यावी.

(२) ज्या सार्वजनिक प्राधिकरणांनी अद्याप कलम - ४ च्या तरतूदींना अपेक्षित १७ बाबींवरिल माहिती तयार करून जनतेकरिता उपलब्ध केलेली नाही व शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेली नाही. तसेच सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिका-यांना निर्देशित करून त्यांचे फलक दर्शनी ठिकाणी लावले नाहीत अशा सार्वजनिक प्राधिकरणांनी कोणत्याही परिस्थितीत **दिनाक ३१/८/२००९ पर्यन्त अशी कार्यवाही पूर्ण**

**करावी. दिनांक ३१/८/२००९ नंतर याबाबत जनतेकडून तक्रार प्राप्त झाल्यास संबंधिताविरुध्द कठोर कार्यवाही करण्याची व संबंधित कार्यालय प्रमुखांच्या गोपनीय अहवालात तशी नोंद घेण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.**

(३) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यालयाच्या १०० टक्के अनुपालनासंदर्भातील संकलित अहवाल **दिनांक ३१/८/२००९** पर्यन्त शासनास पाठवावा. सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी यादी व त्यांच्या कार्यपूर्तते बाबतची नोंद त्यात असणे आवश्यक राहील.

(४) या शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा अहवाल सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी या विभागाकडे कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१.८.२००९ पर्यंत सादर करावा.

(५) हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या w.w.w.maharashtra.gov.in या वेसाईटवर संगणक संकेतांक क्रमांक २००९०८१११६४६२३००१ वर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

**महाराष्टाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**(क.कि.पारकर)**
**शासनाच्या उप सचिव.**

प्रत,

१) सहसचिव / सर्व उपसचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
२) वि.का.अ., सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
३) सर्व अवर सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
४) सर्व कार्यासन अधिकारी / कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
५) प्रधान सचिव (सहकार व पणन व वस्त्रोद्योग ) यांचे स्वीय सहाय्यक,सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२,
६) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) साखर आयुक्त, साखर संकुल, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) संचालक,महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ,लोटस हाऊस,३३ए,सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, -मुंबई-२०.
९) संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय,उमरेड रोड, नागपूर-४४०००९ण(प्रादेशिक, नागपूर, सोलापूर)
१०) संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, वाशानी चेंबर्स, ४७ सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, -मुंबई २०
११) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, एम.एस.एच.सी. कॉम्पेक्स, उमरेड रोड, नागपूर-४४० ००९
१२) संचालक पणन, पणन संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) संचालक, महाराष्ट्र गृहनिर्माण वित्तीय महामंडळ, हाऊसिंग भवन, प्लॉट नं. सी २१, ई ब्लॉक,-बांद्रा -कुर्ला कॉम्ल्पेक्स, रिझर्व्ह बँकेच्या मागे, मुंबई-५१.
१४) व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, ५८३बी, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-३७.
१५) माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, कानमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई-९.
१६) संचालक रेशीम, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर, द्वारा- महाराष्ट्र राज्य हातमाग -महामंडळ, एम.एस.एच.सी. कॉम्पेक्स, उमरेड रोड, नागपूर-४४०००९.
१७) सरव्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ, खेतान भवन, मुंबई-२०.

**<u>गोपनीय</u>**

**संशयास्पद सचोटी असलेल्या**
**<u>अधिकाऱ्यांची यादी बनविण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक सीडीआर-१००५/प्र.क्र.१/०५/११
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३० ऑक्टोबर, २००६

संदर्भ :- (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-२०७२/६८६/डी-१, दि.१४ मार्च, १९७२,
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-२०७७/८०७/३७/११, दि.१८ मार्च, १९७७,
(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-२०७७/८०७/३७/११, दि.१५ फेब्रुवारी, १९७८,

**<u>प रि प त्र क</u>**

शासनाच्या सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या सचोटीची खात्री करुन घेऊन ज्यांची सचोटी संशयास्पद आहे, अशा अधिकाऱ्यांची यादी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-२०७२/६८६/डी-१, दि.१४ मार्च, १९७२ मधील विहित कार्यपद्धतीनुसार करावी, अशा सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, सदर अधिकाऱ्यांवर नजर ठेवावी व ज्यांनी अशा प्रकारे कार्यवाही केली नसेल तर त्यांना जबाबदार धरण्यात यावे, अशा सूचना शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-२०७७/८०७/३७/११, दि.१८ मार्च, १९७७ व दि.१५ फेब्रुवारी, १९७८ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही, असे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

२. शासकीय कार्यालयामधील भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यांसदर्भातील शासनाच्या सध्याच्या सर्वसाधारण धोरणांचा विचार करता, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-२०७२/६८६/डी-१, दि.१४ मार्च, १९७२ मध्ये नमूद केलेल्या सूचना पुन्हा सर्व विभागप्रमुखांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार शासकीय सेवकाची संशयास्पद सचोटी ठरविण्यासाठी पुढीलप्रमाणे निकष विचारात घेऊन विभाग प्रमुखांनी यादी तयार करावी :-

(अ) ज्या अधिकाऱ्यांविरुद्ध सापळाप्रकरणी कारवाई झाली आहे,

(ब) अपसंपदेप्रकरणी ज्या अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल झालाआहे,

(क) ज्या अधिकाऱ्यांचे चारित्र्य संशयास्पद आहे, असे विभागप्रमुखांच्या लक्षात आले आहे व याबाबतीत सदर अधिकाऱ्याचे चारित्र्य संशयास्पद आहे हे स्पष्ट करणाऱ्या ठोस घटना/वर्तन उपलब्ध आहेत. अशा अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालामध्ये त्या अधिकाऱ्यांची सचोटी संशयास्पद असे नमूद करण्यात यावे व त्यासाठी ठोस कारणमीमांसा देण्यात यावी. तसेच, या अधिकाऱ्यांची नावे संशयास्पद सचोटीच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात यावीत.

**(कृ.मा.प...**

३. विभागप्रमुखांनी वरीलप्रमाणे यादी तयार केल्यानंतर ती ॲन्टी करप्शन ब्युरोस पाठवावी. ॲन्टी करप्शन ब्युरो आवश्यकतेनुसार या अधिकाऱ्यांबाबत गुप्त चौकशी करुन त्यांचा अहवाल संबंधित प्रशासकीय विभागास सादर करतील. संबंधित प्रशासकीय विभागाने ही यादी अंतिम करुन त्यास शासनाची मान्यता प्राप्त करुन घ्यावी. अशा प्रकारे विभागप्रमुख, संबंधित प्रशासकीय विभाग व ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्या सहमतीने ही यादी तयार करावी. तयार करण्यात आलेली अशी यादी तीन वर्षाकरिता प्रभावी राहील व दरवर्षी जुलै महिन्यामध्ये या यादीचे पुनर्विलोकन करण्यात येईल.

४. सदर यादीचा वापर पदोन्नती, महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती, पारपत्र देणे, केंद्रीय नियुक्ती, परदेश प्रशिक्षण, विविध प्रकारचे मेडल्स व गौरव पुरस्कार देताना करण्यात यावा.

५. सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभागप्रमुखांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भि. रा. वाळवे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मुख्य सचिव/सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*आयुक्त राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

--------

* पत्राने

**राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त या पदनामांचा उल्लेख योग्य त-हेने <u>करण्याबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
शासन परिपत्रक क्रमांक - रामाआ २००९/१२३८/प्र.क्र.५४१/सहा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ९/११/२०११.

<u>परिपत्रक :-</u>

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १५(१) अन्वये महाराष्ट्र राज्य माहिती आयोग गठित करण्यात आलेला आहे. या अधिनियमाच्या कलम १५(२) नुसार राज्य माहिती आयोगावर एक मुख्य माहिती आयुवत आणि आवश्यक असतील त्याप्रमाणे, दहापेक्षा अधिक नसतील इतके राज्य माहिती आयुवत नेमण्याची तरतूद आहे. कलम १५(७) नुसार राज्य माहिती आयोगास, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने राज्यात अन्य ठिकाणी कार्यालये स्थापन करण्याची शक्ती प्रदान करण्यात आली आहे. आयोगाच्या प्रस्तावानुसार शासनाने राज्यात विविध ठिकाणी आयोगाची कार्यालये स्थापन केली आहेत. सर्वसामान्य जनतेच्या सोयीसाठी राज्य शासनाने महसूल विभागनिहाय आयोगाची कायालये स्थापन केली आहेत. तर मुंबई येथील कामाचा व्याप लक्षात घेवून बृहन्मुंबई क्षेत्राकरिता स्वतंत्र कार्यालय स्थापन करण्यात आले आहे.

२. सद्यस्थितीत राज्य मुख्य माहिती आयुवत मुंबई व राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई, कोकण विभाग ( नवी मुंबई ), पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती यांची कार्यालये अस्तित्वात आहेत. राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांनी शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की,

"राज्य माहिती आयुक्त" या पदनामाचा उल्लेख शासकीय पत्रव्यवहारात ब-याच वेळा "विभागीय आयुक्त " असा करण्यात येतो.

३. " राज्य माहिती आयुक्त " व " विभागीय आयुक्त " ही पदनामे पूर्णत: भिन्न असल्याने यापुढे या पदनामांचा राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई व राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई,नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व अमरावती असा उल्लेख करण्याबाबत आपल्या विभागास व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय कार्यालयांना , सार्वजनिक प्राधिकरणांना कळविण्यात यावे.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या wwwmaharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१११२०३१६२०००००१ आसा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सि.मं.इनामदार )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा.मुख्यमंत्री/ मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ सचिव
सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई शहर / कोकण विभाग / पुणे विभाग / औरंगाबाद विभाग / नागपूर विभाग / अमरावती विभाग
सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
शासनाच्या नियंत्रणाखालील सर्व मंडळे / महामंडळे व शासनाचे सर्व सार्वजनिक उपक्रम सर्व महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषदा
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
निवडनस्ती कार्यासन -सहा

---------

एच-२२७६ -१३।.
D:\MILINDG.R. regarding Sumptury allowance.lwp

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ करिताच्या बोधचिन्हा (LOGO ) बाबत**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
शासन परिपत्रक क्रमांक - केमाअ २०११ /४०८/प्र.क्र.२२९/११/सहा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २२/११/२०११.

**परिपत्रक :-**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ करिता केंद्र शासनाने " बोधचिन्ह " (LOGO) तयार केलेले आहे ( सोबत झेरॉक्स प्रत जोडली आहे ) हे बोधचिन्ह सर्व शासकीय कार्यालयात/ सार्वजनिक प्राधिकरणात जेथे कार्यालयीन टपाल स्वीकारले जाते तेथे ठळकपणे दृष्टीपथास पडेल अशा ठिकाणी प्रदर्शित करावयाचे आहे तसेच ते शासनाच्या सर्व प्रकारच्या लेखन सामुग्रीवर प्रादेशिक मराठी भाषेत छापून घेणे आवश्यक आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या बोधचिन्हाचा (LOGO) वापर कसा करावा याबाबतच्या मार्गदर्शक सूचना केंद्रशासनाच्या www. rtigateway.org.in हया संकेतस्थळावर तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या gad.maharashtra.gov.in हया संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, मंत्रालयीन विभागामध्ये तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या व संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांच्या ठिकाणी हे बोधचिन्ह प्रदर्शित करण्याबाबत तसेच सर्व शासकीय सामुग्रीवरही छापून घेण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. याची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन अनुपालन अहवाल या विभागास तात्काळ सादर करण्यात यावा.

४. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या wwwmaharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१११२२१११४१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( नंदकुमार जंत्रे )**
**सचिव ( प्र.सु.व र.व का. )**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

मा.मुख्यमंत्री/ मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ सचिव
सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिव यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई
व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई, नागपूर, औरंगाबाद, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१ महाराष्ट्र , मुंबई
महालेखापाल ( लेखा परिक्षा-१, महाराष्ट्र, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
निवडनस्ती कार्यासन -सहा

सूचना का
अधिकार

**संशयास्पद सचोटी असलेल्या अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अपर मुख्य सचिव(दक्षता) अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक सीडीआर-१००५/प्र.क्र.१/०५/११
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २४ जुलै,२००७

**शासन निर्णय :-**

शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचाराचे निमूर्लन करण्यासंदर्भातील शासनाच्या सध्याच्या सर्वसाधारण धोरणाचा विचार करता शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-१००५/प्र.क्र.१/०५/११, दिनांक ३० ऑक्टोबर,२००६ नुसार शासकीय सेवकांची संशयास्पद सचोटी ठरविण्यासाठी निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. संशयास्पद सचोटी असलेल्या अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मंत्रालय पातळीवर अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्याकडे अपर मुख्य सचिव (दक्षता) या पदाचे काम सोपविण्यात येत आहे. सदर पदाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत :-

१) सर्व प्रशासकीय विभाग संशयास्पद स्वरुपाच्या कोणत्याही धारिका व कागदपत्रे अपर मुख्य सचिव (दक्षता) यांना सादर करतील.

२) शासन परिपत्रक, दिनांक ३० ऑक्टोबर,२००६ नुसार प्रशासकीय विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रकरणी उचित निर्णय घेऊन थेट मुख्य सचिव व मा.मुख्यमंत्री महोदयांना आपला अहवाल सादर करतील.

३) सर्व विभागाच्या दक्षता प्रकरणामध्ये तसेच अंतर्गत (दक्षता) यंत्रणामध्ये समन्वय राखण्याचे कामावर नियंत्रण ठेवतील.

२. सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख यांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७०७२४१३४६१३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( जॉनी जोसेफ )**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

**(कृ.मा.प...**

उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*आयुक्त राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

-------

* पत्राने